# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk2a@dte org.in Internet :http/www.dte.org.in


क्रमांकः २अ/एडीएम/हमीपत्र/२०१३/ ०७
दिनांक : 17 APR 2013

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

**विषय : शै.वर्ष २०१३-१४ करीता सर्व संबधित संस्थांकडून घ्यावयाचे हमीपत्र.**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांकडून त्यांच्या संस्थेत उपलब्ध असलेल्या सर्व सोयी सुविधाबाबतची माहिती हमीपत्राच्या स्वरुपात घेण्यात यावी. त्याबाबचा नमुना सोबत जोडण्यात येत आहे. सदरहू माहिती संबधित संस्थांकडून संकलित करुन या कार्यालयास दि. १५ मे २०१३ पर्यन्त न चुकता सादर करण्यात यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर

क्र.तंशिस/प्राकाना/शैवि२/हमीपत्र/२०१३/ 1204
दि. 23 APR 2013

प्रति,
प्राचार्य,
पदविका, पदवी ,पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था.

उपरोक्त पत्रात नमूद केल्याप्रमाणे सोबत जोडलेल्या नमुन्याची माहिती हमीपत्राच्या स्वरुपात ०८ मे २०१३ पर्यत या कार्यालयास न चुकता सादर करावी.

सहसंचालक,
तंत्र शिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

(रुपये 100/- च्या Non Judicial स्टॅम्पपेपरवर नोटराईज्ड)

# हमीपत्र

आम्ही ..........................................................या सोसायटी / ट्रस्टचे अध्यक्ष, सचिव अनुक्रमे .........................................श्री. व श्री. ................................... तसेच --------------------- या संस्थेचे प्राचार्य, संचालक................ .............. खालीलप्रमाणे हमीपत्र लिहून देतात की,

१. संस्थेमध्ये सुरु असलेल्या सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांची माहिती संस्थेच्या..........................या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द माहितीनुसार बरोबर असून त्यात कोणतीही तफावत नाही.

२. संस्थेमध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत राबविण्यात येणा-या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या वेळी प्रसिध्द केलेल्या संस्थेच्या माहितीपुस्तीकेत खालील बाबींचा सामावेश करण्यात आलेला आहे.

अ) संस्थेमध्ये मान्यताप्राप्त अभ्यासक्रम आणि प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी प्रवेश क्षमता.

ब) प्रत्येक अभ्यासक्रमासाठी परिषदेच्या निकषाप्रमाणे मंजूर, भरलेली व रिक्त पदांची माहिती पदधारकांची नांवे, त्यांची शैक्षणिक अ-र्हता आणि अभ्यासक्रमनिहाय फी इत्यादी.

क) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार संस्थांमध्ये तक्रारनिवारण अधिकारी यांची नियुक्ती केली असून त्याबाबतची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली असून ..............................या लिंकवर उपलब्ध आहे.

ड) अँटी रॅगींग व अँटी कॅपीटेशन फी ॲक्टच्या तरतूदी संस्थेस बंधनकारक असून त्याबाबतची माहिती संस्थेच्या माहितीपुस्तीकेत व संकेतस्थळावर

उपलब्ध करुन देण्यात आलेली असून ...................... या लिंकवर उपलब्ध आहे.

इ) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार (विशाखा जजमेंट) शैक्षणिक संस्थांमध्ये होणा-या मुलींच्या छेडछाडीवर प्रतिबंध करण्याकरीता संस्थामध्ये महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली असून त्याबाबतची माहिती संस्थेच्या माहितीपुस्तीकेत व संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली असून ...................... या लिंकवर उपलब्ध आहे.

फ) संस्थेतअपंगांसाठी रॅम्प व त्यांच्या सोयीच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आलेली आहे.

ग) अग्नि प्रतिबंधक कायद्यानुसार संस्थेत आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात आलेली आहे.

ह) संस्थेत सिगारेट/तंबाखू आणि इतरअंमली पदार्थांच्या सेवनापासून विद्यार्थ्यांना परावृत्त करण्याकरीता जागृती व तद्‌अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

न) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / वास्तुविद्या परिषद व कौन्सिल ऑफ फार्मसी यांच्या विहित मानक व प्रमाणकानुसार संस्थेमध्ये आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

वरील माहिती आमच्या माहितीनुसार बरोबर असून त्यात कोणतीही तफावत नाही. भविष्यात माहितीमध्ये तफावत किंवा खोटी असल्याचे आढळल्यास त्यास सर्वस्वी आम्ही जबाबदार राहू.

| अध्यक्ष | सचिव | प्राचार्य / संचालक |
|---|---|---|
| (नांव व संस्थेचे सिल ) | (नांव व संस्थेचे सिल ) | (नांव व संस्थेचे सिल ) |